ePaper
महाराष्ट्राच्या दिशेनं येतय मोठं संकट, उरले फक्त काही तास, आयएमडीचा हायअलर्ट

| वर्ष - 8 | अंक - 251 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™



## आतील पानांत


- मुंबईचा वानखेडेवर दिमाखदार विजय
- मॅचच्या टेन्शनमुळे दुपारी जेवलो नाही
- वक्फ विधेयकावरून काँग्रेसची टीका
- बांगलादेश महासागराचा एकमेव संरक्षक


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 1 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### कर्जमाफी, 7/12 कोरा करण्याचा मामला..हा तर निवडणूक जुमला ?

# शेतकऱ्यांना दिलेला वादा, क्या भूल गये अजितदादा?

## दि. 31 मार्च गेला.. शेतकऱ्यांच्या नशिबी नोटिसा, तगादा आणि जप्ती

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज



**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आज अक्षरशः दयनीय अवस्था झालेली आहे. दि. ३१ मार्च गेला. ज्यांची पीक कर्जे थकली आहेत, त्यांना आता नोटिसा बजावल्या जातील, तगादे लावले जातील आणि जप्ती सुद्धा येईल. 'महायुती' चे सरकार सत्तेवर आल्यास कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्याचे दिलेले आश्वासन सरकार विसरले आहे.. ते हवेत विरले आहे. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या या आश्वासनाला हरताळ फासला गेला आहे, त्याचे काय ? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

### शेतकऱ्याची कोंडी बघवत नाही..

सरकारने दिलेले आश्वासन न पाळता ऐनवेळी कर्जाची रक्कम भरण्याचे आदेश दिल्यामुळे राज्यातील बळीराजा प्रचंड अडचणीत आला आहे, त्याच्यावर संकटाचे आभाळच कोसळले आहे आणि त्याची कोंडी बघवत नाही.

पाण्याविना पिके करपून गेली, राज्याच्या काही भागात दुष्काळजन्य परिस्थिती आहे, बळीराजाला वीज बिल, शैक्षणिक खर्च तसेच इतर वैयक्तिक खर्च यामध्ये गुरफटून ठेवले गेले आहे आणि जी कर्जे आहेत ती भरण्यासाठी कोठून पैसे आणणार ? असा प्रश्न शेतकरी विचारत आहे.

### कर्जमाफीच्या आश्वासनामुळे निवांत !

विधानसभा निवडणुकीपूर्वी 'महायुती' सरकारच्यावतीने सध्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी स्पष्ट आश्वासन दिले होते, की सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल.

त्या आश्वासनांवर अवलंबून शेतकऱ्यांनी 'महायुती' ला भरभरून मते दिली आणि आता कर्जमाफी होत नसल्यामुळे बळीराजा प्रचंड संकटात सापडला आहे. कर्जमाफी होणार म्हणून तो जराशी निवांतच होता, तो विंतपणा आता नडला आहे.

### सर्व शेतकरी नेत्यांचा हल्लाबोल..

महाराष्ट्रातील सर्व शेतकरी नेत्यांनी 'महायुती' सरकारवर विशेषतः अजितदादा पवार यांच्यावर हल्लाबोल केला आहे. राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे, हे अजितदादांना माहीत नव्हते काय? आणि जर पैसे नव्हते, तर असे फसवणारे आश्वासन का दिले? हा प्रश्न राज्यातील शेतकरी नेत्यांनी विचारला आहे. सरकारच्या सध्याच्या कामकाजावर या सर्वच नेत्यांनी कडाडून टीका केली असून त्यांना शेतकऱ्यांबद्दल अजिबात आपलेपणा नाही, असे म्हटले आहे. टीका करणाऱ्या या शेतकरी नेत्यांमध्ये राजू शेट्टी, डॉ. अजित नवले, विजय जावंदिया, विनायक हेगाणा यांचा समावेश आहे.

### लाडक्या बहिणींचे भवितव्य देखील अधांतरी !

राज्यातील 'महायुती' सरकारचे आर्थिक गणित बिघडलेल्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांचा रोष पत्करावा लागत असतानाच राज ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे 'लाडक्या बहिणीं'चे देखील भवितव्य अधांतरी वाटू लागले आहे. सरकारच्या तिजोरीमध्ये खडखडाट असून यापुढे लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला मिळणारे १,५०० रुपये मिळणे अवघड आहे, असे राज ठाकरे म्हणून गेले आहेत.

### अजितदादांची सूचना शेतकऱ्यांच्या पोटात गोळा आणणारी !

अजितदादांनी दोन दिवसांपूर्वी केलेले वक्तव्य राज्यातील तमाम शेतकऱ्यांच्या पोटात गोळा आणणारे ठरले आहे. दि. ३१ मार्चपूर्वी पिकांचे कर्ज फेडा, असा आदेश अर्थमंत्र्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला अजितदादांनी साफ नकार दिला असून राज्यातील आर्थिक स्थितीचे कारण पुढे केले आहे. अजितदादांनी म्हटले आहे, की राज्यातील शेतकऱ्यांना यापूर्वी वीज माफी, पीक कर्जाच्या व्याजात सवलत, दुधाचे अनुदान देण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेमुळे सुमारे ४५ हजार कोटींचा बोजा सरकारने केलेला असतानाही कर्जमाफी देण्यासारखी सध्या तरी आर्थिक स्थिती नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी दि. ३१ मार्चपूर्वी कर्जाची फेड करावी, अशी सूचना अजितदादांनी केली होती.

### अर्थमंत्री अजितदादा कोंडीत..

अर्थात्, अर्थमंत्री म्हणून अजितदादा पवार यांच्या नियोजनावरच सर्व खापर फुटत असून चारही बाजूंनी त्यांना कोंडीत पकडण्यात आले आहे.

# विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य!

## भारतरत्न जे. आर. डी. टाटा अर्थसाहाय्य योजनेची अर्ज प्रक्रिया सुरु

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भारतरत्न जे. आर. डी. टाटा अर्थसाहाय्य योजनेसाठीची अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२१ ते २१ एप्रिल २०२५ या कालावधीत पीएच.डी.साठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार असून, अर्ज करण्यासाठी २१ एप्रिल ही अंतिम मुदत आहे.**




विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागून आर्थिक अडचणींचा सामना न करता पीएच.डी.चे संशोधन दर्जेदार करता येण्यासाठी विद्यापीठ विभाग, विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रात प्रवेशित विद्यार्थ्यांना २०१८ पासून 'भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना' लागू करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या योजनेचे नाव बदलून भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसाहाय्य योजना असे करण्यात आले आहे.या योजनेनुसार विद्यापीठ परिसरातील विभांगामध्ये पीएच. डी. करणाऱ्या कमाल १०० विद्यार्थ्यांची, तर प्रत्येक संशोधन केंद्रांतील कमाल दोन विद्यार्थ्यांच्या तीन वर्षांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल. या शिष्यवृत्तीसाठी गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. या योजनेत पात्र ठरण्यासाठीची नियमावली विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आली आहे.योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ते नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी फॉर्म नंबर १६ किंवा आयकर भरल्याची पावती देणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्तम २ लाख ५० हजारांपेक्षा जास्त नसल्याबाबत तहसीलदाराचा दाखला आवश्यक आहे. पीएच. डी. अभ्यासक्रम अर्धवट सोडून दिल्यास किंवा पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ नोकरी केल्यास अर्थसाहाय्याची रक्कम परत करावी लागेल. अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही, इतर कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेला नसावा, विद्यार्थ्यांची किमान ७५ टक्के हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने प्रमाणित करणे आणि विद्यार्थ्यांच्या पीएच. डी. नोंदणी दिनांकापासून उपस्थितीबाबत मार्गदर्शक, विभागप्रमुख आणि प्राचार्य यांचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील, दर सहा महिन्यांनी प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक राहील, असे नमूद करण्यात आले आहे. विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागून आर्थिक अडचणींचा सामना न करता पीएच.डी.चे संशोधन दर्जेदार करता येण्यासाठी विद्यापीठ विभाग, विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रात प्रवेशित विद्यार्थ्यांना २०१८ पासून 'भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना' लागू करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या योजनेचे नाव बदलून भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसाहाय्य योजना असे करण्यात आले आहे.या योजनेनुसार विद्यापीठ परिसरातील विभांगामध्ये पीएच. डी. करणाऱ्या कमाल १०० विद्यार्थ्यांची, तर प्रत्येक संशोधन केंद्रांतील कमाल दोन विद्यार्थ्यांच्या तीन वर्षांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल. या शिष्यवृत्तीसाठी गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. या योजनेत पात्र ठरण्यासाठीची नियमावली विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आली आहे. पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भारतरत्न जे. आर. डी. टाटा अर्थसाहाय्य योजनेसाठीची अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ते नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक आहे.

### जे.आर.डी. टाटा अर्थसाहाय्य योजना

भारतरत्न जे. आर. डी. टाटा अर्थसाहाय्य योजनेसाठीची अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली विद्यार्थ्यांना २०१८ पासून 'भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना' लागू करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या योजनेचे नाव बदलून भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसाहाय्य योजना असे करण्यात आले आहे.

# संपूर्ण पुणे शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

## तर शुक्रवारी उशीरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे येत्या गुरुवारी (३ एप्रिल) महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (४ एप्रिल) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.**




जुने आणि नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, भामा आसखेड, लष्कर जलकेंद्र, होळकर जलकेंद्र, वडगाव जलकेंद्र, राजीव गांधी पंपिंग, खडकवासला जॅकवेल, वारजे जलकेंद्र, एसएनडीटी, चांदणी चौक, गांधीभवन टाकी, पॅनकार्ड क्लब, वारजे जलकेंद्र, चतु:श्रृंगी जलकेंद्र, कोंढवे-धावडे जलकेंद्र यांच्यासह अन्य जलकेंद्रांतील जलवाहिन्यांमध्ये ही कामे करण्यात येणार आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली.मध्यवर्ती भागातील सर्व पेठा, क्वार्टरगेट परिसर, गंजपेठ, गुरुवार पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजी नगर, स्वारगेट, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर १ आणि २, लेक टाऊन परिसर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी गावठाण, डायस प्लॉट, ढोले मळा परिसर, सॅलेसबरी पार्क, गिरीधर भवन चौक परिसर, पर्वती गावठाण, मीठानगर, शिवनेरी नगर, भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज, धनकवडी परिसर, हडपसर, आयसीएस कॉलनी, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंदानगर, जयभवानीनगर, केळेवाडी, आयडीयल कॉलनी, जनवाडी, वैदूवाडी, संगमवाडी, हिंगणे, आनंदनगर, वडगांव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, भारती विद्यापीठ परिसर, कोंढवा बुद्रुक, आंबेगाव, येवलेवाडी या भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे.

### उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची दुरुस्ती

उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे येत्या गुरुवारी (३ एप्रिल) महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (४ एप्रिल) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## FACT CHECK : 90 कोटींची उधळपट्टी?

# टेल्को रस्ता होणार “हायफाय”!

### गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौक टेल्को रस्त्याचा प्रश्न

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड शहरातील 61 मीटर रुंदीचे अंतर्गत रस्ते केवळ दोन आहेत. त्यामधील एक गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौक अर्थात टेल्को रस्ता आता ‘हायफाय’ होणार आहे. या रस्त्याचे काम महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतले आहे. सुमारे 90 कोटी रुपयांचा खर्च त्यासाठी करण्यात येणार आहे. एव्हढ्या मोठ्या प्रमाणात खर्च केल्यादा दावा करीत या रस्त्याच्या कामाला गालबोट लावण्यात येत आहे. याबाबत ‘महाईन्यूज’ च्या माध्यमातून ‘FACT CHECK’ करण्यात आली.**




टेल्को रस्ता हा शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक रस्ता आहे. टेल्को रस्त्याची एकुण लांबी 8500 मीटर इतकी आहे. त्यापैकी गवळी माथा ते इंद्रायणी नगर चौकापर्यंतचा रस्ता अद्यायावत पद्धतीने विकसित करण्याचे नियोजित असून त्याची लांबी 1175 मी. व विकास आराखड्याप्रमाणे रस्त्याची रुंदी 61 मी. आहे. त्यास अनुसरुन सदर रस्त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांची रीतसर नेमणुक करणेत आलेली आहे. मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांनी सदर रस्त्याचे आवश्यक सर्वेक्षण करुन नकाशे व अंदाजपत्रक तयार केले आहे.

सदर अंदाजपत्रकामध्ये स्थापत्यविषयक कामे, विद्युतविषयक कामे, पाणीपुरवठा व जलनिःसारणविषयक कामे इ. बाबींचा समावेश करणेत आलेला आहे. त्यामुळे केवळ रस्त्याच्या कामावर 90 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे, असा FAKE NARRATIVE करण्याचा प्रयत्न चव्हाट्यावर आला आहे.

**काय आहे प्रकल्प?**

**अ) रस्त्याचे रुंदीकरणः**

सद्यस्थितीत टेल्को रस्ता सहा पदरी आहे. परंतु, तो अपुरा पडत असल्याचे ट्राफिक सर्वेक्षणातून स्पष्ट होते. त्यामुळे, रस्त्याच्या दोन्ही बाजूस एक लेन वाढवून हा रस्ता एकूण आठ पदरी करण्यात येणार आहे. तसेच, पार्किंगसाठी स्वतंत्र लेन तयार करण्यात येणार आहे. अस्तित्वातील मुख्य रस्त्यावर DBM आणि BC चा थर देऊन रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस ९०० मिमी. व्यासाची पावसाळी वाहिनी नव्याने टाकणेत येणार आहे.रस्त्याला नवीन उंच दुभाजक बसविण्यात येणार आहे.

**ब) सेवा रस्त्याचे विकसनः**

अस्तित्वातील सेवा रस्ता 900मिमी. व्यासाच्या पावसाळी वाहिनीसहित अद्ययावत पद्धतीने विकसित करणेत येणार आहे. तसेच, आवश्यक त्या ठिकाणी नविन सेवा रस्ता विकसित करण्यात येणार आहे.

**क) रस्त्याचे अद्यावत पद्धतीने विकसनः**

1. पार्किंग-2.5 मी.
2. Multi Utility Zone (MUZ)- 1.0 मी.
3. सायकल ट्रॅक-2.5 मी.
4. ग्रीन झोन-1.0 मी.
5. फुटपाथ-3.0 मी.
6. सेवा वाहिन्या-9 नग
7. Recreational Area / सेवा रस्ता-7.0 मी.
8. जिम
9. दोन ठिकाणी नागरिकांसाठी शौचालय बांधण्यात येणार आहेत.

**ड) विद्युत विभागाची कामे:**

अस्तित्वातील उच्च दाब व कमी दाबाच्या सुमारे 26 वे च्या विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यात येणार आहेत. रस्त्यावर आकर्षक पथदिवे बसविण्यात येणार आहेत.

**इ) पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाची कामे:**

एमआयडीसी व पिंपरी चिंचवड मनपाच्या सुमारे पाच जलवाहिन्या स्थलांतरित करणेत अथवा नवीन टाकणेत येणार आहेत. 300 मिमी. व 450 मिमी. व्यासाच्या नवीन जलनिःसारण वाहिन्या टाकण्यात येणार आहेत.

### प्रकल्पाच्या खर्चाचे वर्गीकरण

प्रशासकीय मान्यता र. रु. : र.रु. 1,11,00,00,000/-
निविदा र. रु.
1. स्थापत्य र.रु. 55, 18,88,942/-
2. पाणीपुरवठा- र.रु 8,58,26,059/-
3. जलनिःसारण- र.रु. 1,98,08,650/-4. विद्युत- र.रु. 24,90,53,804/-
एकुण निविदा : र. रु. 90,65,77,455/-

### निष्कर्ष/ वस्तुस्थिती

शहरातील सर्वात रुंद रस्ता टेल्को रस्त्यावरील गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौक या टप्यात महापालिका प्रशासन केवळ रस्त्याचे नव्हे, तर पाणी पुरवठा, जलनि:सारण, विद्युत विषय कामे करीत आहे. तसेच, 1. पार्किंग-2.5 मी. 2. Multi Utility Zone (MUZ)- 1.0 मी. 3. सायकल ट्रॅक-2.5 मी. 4. ग्रीन झोन-1.0 मी.5. फुटपाथ-3.0 मी.6. सेवा वाहिन्या-9 नग 7. Recreational Area / सेवा रस्ता-7.0 मी.8. जिम 9. दोन ठिकाणी नागरिकांसाठी शौचालय बांधण्यात येणार आहेत. अशा सोयी-सुविधा देणार आहे. त्यामुळे केवळ रस्त्याच्या कामासाठी 90 कोटी रुपये खर्च होत आहेत, असा दावा करणे म्हणजे अर्धवट माहितीच्या आधारे पिंपरी-चिंचवडकरांची दिशाभूल करणे आहे. वास्तविक, विविध विभागाचे अधिकारी या प्रकल्पासाठी काम करीत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. मात्र, काही पत्रपंडीत अपूर्ण माहितीच्या आधारे FACK NARRATIVE करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे स्पष्ट होत आहे.

---

## भीमा कोरेगावमधील विजयस्तंभाला अभिवादन!

### विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी तुळापूर वढू येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचेही घेतले दर्शन

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|




नवनिर्वाचित विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सोमवारी (दि.३१) भीमा कोरेगाव येथील विजय स्मृतीस्तंभाला अभिवादन केले. सोबतच वढू बुद्रुक (ता.शिरूर) येथील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीचे, कवी कलश समाधी व गोविंद गोपाळ यांचे बनसोडे यांनी दर्शन घेतले. संभाजी महाराज यांची ३३६ वी पुण्यतिथी तीन दिवसांपूर्वी झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांनी दर्शन घेतले होते. सोमवारी अण्णा बनसोडे यांनी शंभूंच्या समाधीचे दर्शन घेत वढू बुद्रुक ग्रामपंचायतीचे पांडुरंग गायकवाड यांच्या घरी भेट दिली. यावेळी सरपंच तुळापूर गुंफा इंगळे, सरपंच वढू बुद्रूक माऊली भंडारे, कोरेगांव भीमाचे संरपंच संदीप ढेरंगे, माजी सरपंच अंकुश शिवले,

### ग्रामस्थांच्यावतीने निवेदन....

यावेळी भीमा कोरेगाव ते पिंपळे जगताप रस्ता करण्याबाबत आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करण्याची मागण्यांचे निवेदन ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यासह ग्रामस्थांनी उपाध्यक्ष बनसोडे यांना दिले. सोबतच, धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समितीच्या वतीनेही संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीदिनी शासकीय सुट्टी देण्यासोबतच पुण्यतिथीच्या दिवशी हेलिकॉप्टरद्वारे शासनाच्या वतीने पुष्पवृष्टी करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन स्मृती समितीच्या वतीने देण्यात आले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



**स्वतःला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच.**

'आपणच काय ते सर्व करणारे' अशी भावना आपण ठेवतो, आणि पुढे दुःख वाट्याला आले म्हणजे वाईट वाटून घेतो. ज्याचे फळ आपल्या हाती नसते ते कर्म 'मी केले' असे म्हणण्यात काय पुरुषार्थ आहे ? 'मी भगवंताचे कृत्य भगवंताला अर्पण करतो' असे म्हणतो, याचासुद्धा अभिमान आपल्याला होतो. जगात सात्त्विक वृत्तीने वागणारे पुष्कळ असतात, पण 'मी करतो' हा अभिमान त्यांचाही सुटत नाही. खरोखर, नुसत्या कर्माने परमार्थ साधत नाही; 'कर्ता मी नाही' हे समजले म्हणजे सर्व साधते. नसलेले कर्तेपण आपल्याकडे ओढून घेऊन माणूस सुखी किंवा दुःखी होतो. ज्याच्याकडे कर्तेपण आहे त्याला ते देऊन आपण सुखदुःखातीत राहावे. खोलीतल्या खोलीत जो सुख मानून घेतो तो कैदी खरा सुखात असेल असे आपल्याला वाटते. देहाच्या पलीकडे काही नाही असे मानू लागलो आणि विषयातच सुख पाहू लागलो, तर ते त्या कैद्याप्रमाणेच नाही का ? पण त्याच्यापलीकडे काही आहे हे त्याला समजले नाही तोपर्यंतच हे सुख वाटेल. एकदा का बाहेरची हवा कैद्याला लागली म्हणजे तो नाही म्हणणार कैदीपणाच चांगला म्हणून. त्याचप्रमाणे एकदा भगवंताच्या आनंदाची हवा लागली म्हणजे माणूस नाही विषयात राहणार. चित्त आपल्याला निर्विषय करता येणार नाही, पण ते भगवंताकडे लावता येणार नाही असे नाही. बुजार घोड्याला जसे चुचकारून घेतात, तसे मनाला करावे. वृत्ती जिथे पालटायला लागते तिथे सावध राहावे. भगवंताचे स्मरण चुकले की काही तरी अवघड वाटायला हवे. आज नको वाटणारे नामस्मरण बळजबरीने करावे, म्हणजे हवेसे वाटणारे विषय जातात. प्रापंचिक अडचणींतून जर आपण मार्ग काढतो तर मग परमार्थातल्या अडचणींना का भ्यावे ? जर आज आपल्याला विवेकाने सुखी राहता आले नाही तर आपल्याला सुख कधीच मिळणार नाही. नुसते गिरिकंदरात जाऊन कुठे परमार्थ साधत असतो का ? तसे असते तर तो माकडांनाही साधला असता ! खालच्या प्राण्यांना आपले विकार आवरण्याचा विचार नसतो. पण मनुष्याला चांगले-वाईट कळते, त्याला सारासार विचार करण्याची शक्ती आहे, ही त्याच्यावर भगवंताची कृपाच आहे. जग सुधारण्याच्या नादी आपण लागू नये; त्या कामासाठी लोक जन्माला यावे लागतात. अगदी आपला मुलगा जरी झाला तरी त्याला योग्य ते सांगून पाहावे, पण 'मी त्याला सुधारीनच' हा भ्रम नसावा. स्वतःला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच.

**बोधवचन:- कर्तव्य म्हणून वकील जसा भांडतो, त्याप्रमाणे कर्तव्य म्हणून प्रामाणिकपणे आपण प्रपंच करावा. त्यामध्ये भगवंताला विसरू नये.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरला जाऊन संघ कार्यालयात सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेऊन आणि विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावून सविस्तर चर्चा करणे, हे ऐकून किंवा पाहून सोडून देण्याइतके सोपे नक्कीच नाही.**

# संघ आऽऽरम..संघ दक्ष, मोदींकडे पूर्णपणे लक्ष !



### भेटी मागं नक्की दडलंय काय ?

संपूर्ण जग या भेटीला जेवढे 'हलक्यात' घेत आहे तेवढी ती नक्कीच किरकोळ नाही. जे संघ परिवाराच्या हालचालींना किंवा नियोजनांना जवळून ओळखतात, तेच या भेटीचा मतितार्थ समजू शकतात. विशेषतः, पंतप्रधान झाल्यापासून नरेंद्र मोदी पहिल्यांदाच संघाच्या 'रेशीम बाग' या मुख्यालयात पोहचले आहेत आणि मोहन भागवत यांनीही त्यांना दिवसभर वेळ दिला आहे, यातच खूप काही 'अंडर करंट्स' आहेत !

### सर्व बैठका, चर्चा बंद दाराआड !

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना होऊन आज १०० वर्षे झाली. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या त्यांच्या आणखी प्रमुख ३२ शाखा आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्ष, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी, संस्कार भारती अशा काही संघटनांचा समावेश आहे, हे अनेकांना माहीत नाही. पण, भाजपाच्या सर्वश्रेष्ठ नेत्याची आपल्या मातृसंस्थेच्या प्रमुखाशी झालेली गुप्त बैठक ही भविष्याच्या दृष्टीने, तगड्या, बलशाली भारताच्या दृष्टीने महत्त्वाची असणार, हे वेगळे सांगायला नको ! संघ म्हणजे शिस्त, संघ म्हणजे नियोजन आणि संघ म्हणजे दूरदृष्टी याबाबत मोदी आणि भागवत यांनी विचारांचे आदान प्रदान केले असणार हेही नक्की ! याचे सकारात्मक पडसाद भविष्यात उमटतील, ते पाहणे आता आपल्या हातात आहे.

### जुन्या हिंदी चित्रपटाचे कथानक..

या पार्श्वभूमीवर एखादा जुना हिंदी चित्रपट आठवतो का ? गुढीपाडव्याला नरेंद्र मोदींची भूमिका त्या चित्रपटाच्या हिरो सारखी ठरली. एकेकाळचा अगदी गरीब नायक पुढे खूप श्रीमंत झाल्यानंतर जेव्हा एक दिवस सोडून गेलेल्या आपल्या सहकाऱ्यांना भेटायला येताना पूर्वीचेच साधे कपडे आणि पायात तीच जुनी चप्पल घालून येतो, त्याची आठवण झाली. मोदी यांनी संघ मुख्यालयात सरसंघचालक मोहन भागवतांना भेटायला येताना अगदी तेच केले. पंतप्रधान झाल्यानंतर अतिशय दर्जेदार कपड्यांमध्ये वावरणारे मोदी येथे मात्र पुन्हा एकदा पूर्वीच्या त्या संघ प्रचारकांच्या पेहरावात अवतरले, हे चाणाक्ष स्वयंसेवकांच्या नजरेतून सुटले नाही. त्यांनी संघ प्रचारक जसा पेहराव करतात किंवा मोदी जसे प्रचारक असतांना कपडे घालायचे हुबेहूब ते त्याच अत्यंत साध्या पेहरावात आले. अर्थात् पुढे छत्तीसगड दौऱ्यामध्ये हेच मोदी त्यांच्या नेहमीच्या दर्जेदार महागड्या पेहरावात दिसले, हे पण सर्वांच्या लक्षात आले.

### मोहन भागवत दोन पावले पुढे !

भागवत त्यांच्याही दोन पावले पुढे होते, त्यांनी देखील पंतप्रधान येत आहेत, म्हणून वेगळा कुठलाही पेहराव न करता मोदींच्या तुलनेत अगदीच साधा पेहराव करीत ते स्वागतला सामोरे गेले. पण, मोदींचे पंतप्रधान झाल्यानंतर पहिल्यांदा संघ मुख्यालयात येणे तसेच संघाच्या विविध कार्यक्रमांना उपस्थिती, त्यातून देशासमोर आणि जगासमोर फार वेगळे संदेश त्यातून गेले, जगातले मान्यवर आश्चर्यचकित झाले, हे मान्य करायलाच हवे !

### भाजपाला संघाशिवाय पर्याय नाही!

भारतीय जनता पार्टीला संघाशिवाय पर्याय नाही, हेच नेमके त्यातून दिसून आले. जे देशातील कडव्या संघ स्वयंसेवकांना आणि भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला अपेक्षित होते, तेच या नागपूर भेटीत पाहायला मिळाले. संघाची आम्हाला गरज नाही, असे म्हणणारे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा सहा महिन्यापूर्वी टीकेचे चांगलेच धनी झाले होते. त्यांच्या वक्तव्याचा फटका लोकसभा निवडणुकीतही बसला. पण, संघाकडे दुर्लक्ष करणे महागात पडते आहे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आले आणि त्यांनी युद्धपातळीवर हालचाली केल्या. विशेषतः, लोकसभा निवडणुकांचे तोंडावर आपटवणारे निकाल लागल्यानंतर फडणवीस यांनी जोरदार हालचाली केल्या, नंतर विधानसभेच्या वेळी त्याची फळे देखील मिळाली !

### भाजपा नेत्यांचा दृष्टिकोन बदलला..

फडणवीस यांनी प्रत्यक्ष भेटीत संघाची भूमिका मोदी-शहा यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर मोदी यांनी जातीने लक्ष घालून स्वयंसेवकांच्या बाबतीत पुन्हा असे घडणार नाही किंवा घडता कामा नये, याची काळजी घेतली. तसे अंतर्गत निरोपही सर्वत्र दिले गेले. अत्यंत महत्वाचे म्हणजे स्वतः फडणवीसांनी देखील भाजपामध्ये बाहेरून आलेल्या नेत्यांकडे दुर्लक्ष न करता किंवा त्यांना देखील नाराज न करता पुन्हा एकदा आपला मोर्चा थेट भाजपच्या मूळ कार्यकर्त्यांकडे आणि संघ स्वयंसेवकांकडे वळविला. त्यांना महत्व दिले, लगेच परिणाम साधला गेला. मोदी-शाह, फडणवीसांवर नाराज असलेले मूळ कार्यकर्ते आणि स्वयंसेवक पुन्हा पूर्वीच्याच उत्साहात जोमात आत्मविश्वासाने कामाला लागले..प्रचाराला लागले आणि बघता बघता नियोजनपूर्वक प्रचारातून अपेक्षित यश मिळवून दिले.

### 'महाआघाडी' चारी मुंड्या चीत!

विधानसभेला फडणवीसांच्या 'महायुती' ने काँग्रेस, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या 'महाआघाडी' ला चारी मुंड्या चीत केले. संघाची ही किमया सर्वांच्याच लक्षात आली आणि त्या अनुषंगाने नियोजनही सुरू झाले. गुढीपाडव्याला कुठल्याही टीकेची काळजी, चिंता, पर्वा न करता मोदी थेट संघ मुख्यालयात आले..ज्यातून पुन्हा एकदा जगभर मोदी आणि त्यांच्या भाजपाची लोकप्रियता व ताकद नक्की वाढलेली दिसेल ! विशेषतः, मोहन भागवत आणि नरेंद्र मोदी या दोघांची नागपुरातली जाहीर देहबोली एकाचवेळी त्या दोघांमधली एकी कशी जीवापाड आहे, हे जगाला दिसून आले..भाजपा विरोधक मात्र या भेटीमुळे अधिक चिंताग्रस्त नक्कीच झालेले असणार, यात मुळीच शंका नाही. संघाचे शिस्तबद्ध नियोजन हीच भाजपाची ताकद आहे, हे नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना समजले असणार..हेही नसे थोडके !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# औरंगजेबाची कबर हटवता येणार नाही!

## कबरीला भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे : मुख्यमंत्री

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**फेब्रुवारी महिन्यात छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी होऊ लागली. भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनीही औरंगजेबाची कबर उखडून टाका अशी मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता ही कबर हटवता येणार नाही असं म्हटलं आहे.**





छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून औरंगजेबाच्या विरोधात राज्यभरात रोष पाहण्यास मिळाला. खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी केली. त्यानंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनीही असाच इशारा दिला. गरज पडल्यास कारसेवा करु आणि कबर हटवू असंही या संघटनांनी सांगितलं. यानंतर औरंगजेबाच्या कबरीला ASI म्हणजेच भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे. राज ठाकरे यांनीही ही कबर उखडू नका उलट तिथे फलक लावा आणि मराठ्यांनी औरंगजेबाला इथे गाडला हे सगळ्यांना सांगा अशी भूमिका घेतली आहे. आता देवेंद्र फडणवीस यांनी ही कबर हटवता येणार नाही असं म्हटलं आहे. औरंगजेबाच्या कबरीबाबत राज ठाकरेंच्या भूमिकेवर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आपल्याला आवडो न आवडो, मात्र हे मान्य करावंच लागेल की औरंगजेबाची कबर ही भारतीय पुरातत्व खात्याच्या अखत्यारित येते. या कबरीला भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे. त्यामुळे कबर तिथून हटवता येणार नाही. मात्र औरंगजेबाचं उदात्तीकरण आम्ही कदापि मान्य करणार नाही. " इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.औरंगजेबाने तेव्हा परत जायला पाहिजे होतं. मात्र, एवढ्या मोठ्या बलाढ्य प्रदेशाचा राजा महाराष्ट्रात ठाण मांडून का बसला होता? कारण औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण हे औरंगजेबाला जमलं नाही, सर्व प्रयत्न केले आणि शेवटी औरंगजेब येथेच मेला. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो. तेव्हा जगभरातील लोकांना कळतं की औरंगजेब काय करायला गेला होता आणि कसा मेला. तेव्हा तेथे जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव येतं", असंही राज ठाकरे म्हणाले.औरंगजेबाच्या कबरीबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले होते, "औरंगजेबाची सध्याची सजवलेली कबर काढून टाका. तेथे फक्त कबर दिसली पाहिजे आणि त्या ठिकाणी एक मोठा बोर्ड लावा. आम्हा मराठ्यांना संपवायाला आलेला औरंगजेब येथे गाडला गेला. हा आमचा इतिहास आहे", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून औरंगजेबाच्या विरोधात राज्यभरात रोष पाहण्यास मिळाला. खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी केली. त्यानंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनीही असाच इशारा दिला. गरज पडल्यास कारसेवा करु आणि कबर हटवू असंही या संघटनांनी सांगितलं. यानंतर औरंगजेबाच्या कबरीला ASI म्हणजेच भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे. राज ठाकरे यांनीही ही कबर उखडू नका उलट तिथे फलक लावा आणि मराठ्यांनी औरंगजेबाला इथे गाडला हे सगळ्यांना सांगा अशी भूमिका घेतली आहे. आता देवेंद्र फडणवीस यांनी ही कबर हटवता येणार नाही असं म्हटलं आहे.औरंगजेबाच्या कबरीबाबत राज ठाकरेंच्या भूमिकेवर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आपल्याला आवडो न आवडो, मात्र हे मान्य करावंच लागेल की औरंगजेबाची कबर ही भारतीय त्यामुळे कबर तिथून हटवता येणार नाही. मात्र औरंगजेबाचं उदात्तीकरण आम्ही कदापि मान्य करणार नाही.

### शेवटी औरंगजेब येथेच मेला

औरंगजेबाने तेव्हा परत जायला पाहिजे होतं. मात्र, एवढ्या मोठ्या बलाढ्य प्रदेशाचा राजा महाराष्ट्रात ठाण मांडून का बसला होता? कारण औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण हे औरंगजेबाला जमलं नाही, सर्व प्रयत्न केले आणि शेवटी औरंगजेब येथेच मेला. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो. तेव्हा जगभरातील लोकांना कळतं की औरंगजेब काय करायला गेला होता आणि कसा मेला. तेव्हा तेथे जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव येतं", असंही राज ठाकरे म्हणाले.औरंगजेबाच्या कबरीबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले होते, "औरंगजेबाची सध्याची सजवलेली कबर काढून टाका. तेथे फक्त कबर दिसली पाहिजे आणि त्या ठिकाणी एक मोठा बोर्ड लावा.

# आपल्याकडे अथिती देवो भवची संस्कृती!

## कुणाल कामराची सूचक पोस्ट, मुंबई पोलिसांना डिवचलं?

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं सादर केलं होतं. या गाण्यानंतर कुणाल कामराच्या विरोधात शिवसेनेचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नाही तर विधानसभेच्या सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर भाष्य करत कारवाईचे संकेत दिले होते. यानंतर कुणाल कामराविरोधात गुन्हा देखील दाखल झाला.**



शिवसेनेच्या (शिंदे) नेत्यांकडून कुणाल कामराला अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे. मात्र, कुणाल कामराने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यानंतर मद्रास उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर करत दिलासा दिला. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला दोनवेळा चौकशीसाठी समन्स बजावले. मात्र, अद्याप कुणाल कामरा चौकशीसाठी हजर झाला नाही. यामुळे मुंबई पोलिसांचं एक पथक आज (३१ मार्च) कुणाल कामराच्या मुंबईतील घरी पोहोचलं होतं. या पार्श्वभूमीवर कुणाल कामराने एक सूचक ट्वीट केलं. तसेच आपण १० वर्षांपासून राहत नसलेल्या ठिकाणी जाणं म्हणजे सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय असल्याचं म्हटलं आहे. कुणाल कामराला पोलिसांनी समन्स बजावलं होतं. मात्र, समन्स देऊनही कुणाल कामरा चौकशीसाठी हजर न झाल्यामुळे आज मुंबई पोलिसांचं एक पथक कुणाल कामराच्या मुंबईतील घरी पोहोचलं होतं. मुंबई पोलिसांचं पथक घरी दाखल झाल्याच्या पार्श्वभूमीवर कुणाल कामराने एक सूचक ट्वीट केलं. "गेल्या १० वर्षांपासून मी जेथे राहत नाही अशा पत्त्यावर जाणं म्हणजे तुमचा वेळ आणि सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय आहे", असं कुणाल कामराने म्हटलं आहे.शिवसेना शिंदे गटाचे नेते राहुल कनाल यांनी कुणाल कामराला सूचक इशारा दिला आहे. राहुल कनाल यांनी म्हटलं की, "कायद्याच्या प्रक्रियेचे पालन करून युवा सेनेचे सदस्य दर सोमवार आणि गुरुवारी पोलीस ठाण्यात हजेरीसाठी येतात. तसेच न्यायालयाने कुणाल कामराला दिलासा दिला आहे.न्यायालयाच्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. मात्र, तो दिलासा ७ एप्रिलपर्यंत आहे. कुणाल कामराने कायदेशीर प्रक्रियेला सामोर जावं. कुणाल कामराला तामिळनाडूमध्ये कितीही संरक्षण असलं तरी जेव्हा मुंबईत येईल तेव्हा शिवसेना स्टाईलने स्वागत करू, ही धमकी नाही, तर आपल्याकडे अथिती देवो भवची संस्कृती आहे.

### नेमकं प्रकरण काय?

स्टँडअप कॉमेडिअन कुणाल कामराने आपल्या शोमध्ये राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत टीका केली होती. यामध्ये कुणाल कामराने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीचा संदर्भ दिला होता. यामध्ये कुणाल कामरा शोमध्ये म्हटलं होतं की, "महाराष्ट्राच्या निवडणुकीत त्यांनी काय केलं आहे, त्यांना सांगावं लागेल.

# वक्फ विधेयकावरून काँग्रेसची सरकारवर टीका!

## आता वक्फ बोर्ड विधेयकाबाबत महत्वाची माहिती समोर

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ बोर्ड विधेयकावरून मागील काही दिवसांपासून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. वक्फ बोर्ड विधेयकाला १४ बदलांसह मंत्रिमंडळाने २७ फेब्रुवारीला मंजुरी दिली. त्यानंतर हे विधेयक संसदेत मांडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर ते विधेयक संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. संसदीय समितीने काही बदल सुचवले होते. त्यानंतर पुन्हा १४ बदलांसह सुधारित वक्फ बोर्ड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती.**




आता २ एप्रिल रोजी हे वक्फ विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. वक्फ विधेयकाला याआधी विरोधकांनी जोरदार विरोध केला होता. यानंतर आता पुन्हा एकदा सुधारित वक्फ विधेयक २ एप्रिल रोजी लोकसभेत मांडलं जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडे टीव्हीने दिलं आहे. त्यामुळे आता हे विधेयक संसदेत मंजूर होणार का? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे.दरम्यान, संसदेत विधेयक सादर करण्यापूर्वी भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ मंत्री विरोधी इंडिया आघाडीच्या नेत्यांशी चर्चा करणार असल्याची देखील शक्यता वर्तवली जात आहे. तसेच संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपणार आहे. त्याआधी म्हणजे २ एप्रिल रोजी हे विधेयक संसदेत मांडण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच वक्फ बोर्ड विधेयकाला अंमलात आणण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभा अशा दोन्ही सभागृहाने मंजूर करणं आवश्यक आहे.

वक्फ बोर्ड विधेयकावरून काँग्रेसने काही दिवसांपूर्वी एक निवेदन जारी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर जोरदार टीका केली होती.जयराम रमेश निवेदनात म्हटलं की, वक्फ बोर्ड (दुरुस्ती) विधेयक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा संविधानावरील आणखी एक हल्ला आहे. हे विधेयक खोटा प्रचार पसरवून समाजातील सामाजिक सलोखा भंग करणे आणि अल्पसंख्याक समाजाच्या परंपरांना बदनाम करून निवडणुकीच्या फायद्यासाठी ध्रुवीकरणाची परिस्थिती निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचं जयराम रमेश यांनी म्हटलं होतं.संपत्तीची नोंदणी करण्यात सुलभता आणण्याचा आहे.१८ फेब्रुवारी २०१४ या दिवशी हे विधेयक राज्यसभेत मांडण्यात आलं होतं.आता २ एप्रिल रोजी हे वक्फ विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. वक्फ विधेयकाला याआधी विरोधकांनी जोरदार विरोध केला होता. यानंतर आता पुन्हा एकदा सुधारित वक्फ विधेयक २ एप्रिल रोजी लोकसभेत मांडलं जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडे टीव्हीने दिलं आहे. त्यामुळे आता हे विधेयक संसदेत मंजूर होणार का? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे.दरम्यान, संसदेत विधेयक सादर करण्यापूर्वी भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ मंत्री विरोधी इंडिया आघाडीच्या नेत्यांशी चर्चा करणार असल्याची देखील शक्यता वर्तवली जात आहे. तसेच संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपणार आहे. त्याआधी म्हणजे २ एप्रिल रोजी हे विधेयक संसदेत मांडण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच वक्फ बोर्ड विधेयकाला अंमलात आणण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभा अशा दोन्ही सभागृहने मंजूर करणं आवश्यक आहे.वक्फ बोर्ड विधेयकावरून काँग्रेसने काही दिवसांपूर्वी एक निवेदन जारी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर जोरदार टीका केली होती.

### विधेयकाचा उद्देश काय आहे?


काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश निवेदनात म्हटलं की, वक्फ बोर्ड (दुरुस्ती) विधेयक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा संविधानावरील आणखी एक हल्ला आहे. हे विधेयक खोटा प्रचार पसरवून समाजातील सामाजिक सलोखा भंग करणे आणि अल्पसंख्याक समाजाच्या परंपरांना बदनाम करून निवडणुकीच्या फायद्यासाठी ध्रुवीकरणाची परिस्थिती निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचं जयराम रमेश यांनी म्हटलं होतं.वक्फ बोर्ड विधेयकाचा उद्देश केंद्रीय पोर्टलच्या माध्यमातून वक्फ बोर्डाच्या मालमत्ता, संपत्तीची नोंदणी करण्यात सुलभता आणण्याचा आहे.

# बांगलादेश महासागराचा एकमेव संरक्षक

## मुहम्मद युनूस यांचे चीनला अर्थव्यवस्थेचा विस्तार करण्याचं आमंत्रण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही महिन्यांपासून भारत आणि बांगलादेशमधील द्विपक्षीय संबंध ताणले गेल्याचं चित्र निर्माण झालं आहे. यातच बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस हे नुकतेच चीनच्या दौऱ्यावर गेले होते. त्यामुळे त्यांचा हा दौरा म्हणजे बांगलादेशकडून भारताला अप्रत्यक्ष संदेश असल्याचं बोललं जात होतं. यातच आता मुहम्मद युनूस यांनी बांगलादेशला 'गार्डियन ऑफ द सी' असं संबोधलं आहे. तसेच मोहम्मद युनूस यांनी चीनला बांगलादेशात अर्थव्यवस्थेचा विस्तार करण्याचं आमंत्रणही दिलं आहे.**

दरम्यान, मोहम्मद युनूस यांचा या संदर्भातील एक व्हिडिओ देखील व्हायरल होत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मोहम्मद युनूस यांनी चीन सरकारला देशात आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी विनंती केली आहे. तसेच ढाका हा महासागराचा एकमेव संरक्षक असल्याचंही युनूस यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहेभारतातील सात ईशान्य राज्ये अजूनही भूपरिवेष्टित आहेत. त्यांच्याकडे महासागरापर्यंत पोहोचण्याचा कोणताही मार्ग नाही. या संपूर्ण प्रदेशासाठी बांगलादेश महासागराचे एकमेव रक्षक आहे. त्यामुळे हा चिनी अर्थव्यवस्थेचा विस्तार होऊ शकतो.

त्यामुळे काही वस्तू तयार करा, उत्पादन करा आणि वस्तू बाजारात आणा, जगभरातील देशांसाठी निर्यात करता येऊ शकतात", असं मोहम्मद युनूस यांनी म्हटलं आहे.दरम्यान, मोहम्मद युनूस यांनी आपण चीन आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांच्या नव्या टप्प्याची वाट पाहत असल्याचंही म्हटलं आहे. तसेच मोहम्मद युनूस यांनी चीनच्या दौऱ्यात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचीही भेट घेतली. या भेटीत युनूस यांनी बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यासाठी चीनला गुंतवणूक वाढवण्याचं आवाहन केलं असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच युनूस यांनी चीनला बांगलादेशातील नद्या आणि पूर व्यवस्थापनासाठी ५० वर्षांचा मास्टर प्लॅन देण्याचं आवाहन केलं आहे. त्यामुळे मोहम्मद युनूस यांच्या या भूमिकेमुळे भविष्यात भारताची डोकेदुखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य संजीव सान्याल यांनी एक्सवर मोहम्मद युनूस यांचा हा व्हिडिओ शेअर केला केला असून पोस्टमध्ये म्हटलं की, "भारतातील ७ राज्ये भूपरिवेष्टित आहेत, या आधारावर युनूस यांनी चीनला जे आवाहन केलं ते मनोरंजक आहे.

### भारताची प्रतिक्रिया काय?

चीनचे आधीपासूनच बांगलादेशसोबत व्यापारी संबंध असून हे अधिकाधिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न चीनकडून केला जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मुहम्मद युनूस यांनी पदभार स्वीकारल्यापासून चीनमधील किमान १४ कंपन्यांनी २३० मिलियन डॉलर्सहून अधिक गुंतवणूक बांगलादेशमध्ये केली आहे.

# 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं पोस्टर प्रदर्शित



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाणच्या 'झापुक झुपूक' चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनला सुरुवात झाली आहे. ३० मार्चला गुढीपाडव्याच्या निमित्तानं डोबिंवलीत झालेल्या शोभायात्रेत सूरज चव्हाण पाहायला मिळाला. यावेळी तो 'झापुक झुपूक' चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसला. त्याचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अशातच आता 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं पोस्टर प्रदर्शित झालं आहे. या पोस्टरमध्ये सूरजसह झळकणारी तगडी कलाकार मंडळी पाहायला मिळत आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये 'झापुक झुपूक' चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला होता. त्यानंतर मार्च महिन्याच्या सुरुवातीला 'झापुक झुपूक' चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं. त्यामुळे आता केदार शिंदे दिग्दर्शित हा चित्रपट मनोरंजनासाठी सज्ज झाला आहे. २५ एप्रिलला प्रदर्शित होणाऱ्या 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं पोस्टर 'जिओ स्टुडिओ'नं सोशल मीडियावर शेअर केलं आहे."टॉपचा किंग आलाय पिक्चरमधल्या सगळ्यांना घेऊन... आता २५ एप्रिलपासून अख्खं थिएटर हादरणार... तयार राहा. कारण- हा पिक्चर एकदम 'झापुक झुपूक' असणार. 'नाही तर बुक्कीत टेंगुळ', अशी कॅप्शन लिहीत 'जिओ स्टुडिओ मराठी'च्या इन्स्टाग्रामवर 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं आहे. या पोस्टरमध्ये सूरजसह अभिनेता इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, जुई भागवत, दीपाली पानसरे, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे कलाकार दिसत आहेत. झापुक झुपूक' चित्रपटाचं हे नवं पोस्टर सध्या चर्चेत आलं आहे. या पोस्टरमुळे प्रेक्षकांमधली उत्सुकता आणखी वाढली आहे.

# एकता कपूर कुणाचंही करिअर उद्ध्वस्त करू शकते

अभिनेत्री बरखा बिष्ट (BARKHA BISHT) ही टीव्ही मालिका आणि बॉलीवूडमधील एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर बरखानं अनेक कलाकृतींमधून तिच्या अभिनयाद्वारे प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. २१ वर्षांपूर्वी 'कितनी मस्त है जिंदगी' या मालिकेद्वारे तिनं टेलिव्हिजन क्षेत्रात प्रवेश केला. मात्र, सुरुवातीला अभिनेत्रीला या क्षेत्रात खूप संघर्ष करावा लागला होता. याच संघर्ष काळाबद्दल बरखानं नुकत्याच एका मुलाखतीत वक्तव्य केलं आहे. अवघ्या २३ व्या वर्षी 'बालाजी टेलिफिल्म्स'चा शो सोडल्यानंतर तिला अडचणी आल्या. त्याबद्दल बरखानं तिची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत बरखानं निर्माती एकता कपूरविरुद्धदिलेल्या न्यायालयीन लढ्याबद्दल सांगितलं. यावेळी तिनं सांगितलं की, हा खटला बरखानं स्वतः लढवला. तसेच त्यावेळी तिनं त्यामागील काही कारणंही उघड केली. बरखानं असंही म्हटलं की, एकता कपूर माझं करिअर संपवू शकली असती; परंतु तिनं माघार घेतली.एकता कपूरविरुद्धच्या कायदेशीर खटल्याबद्दल बरखा असं म्हणाली, "मी घरी कोणालाही सांगितलं नाही. मी एका वकिलाची मदत घेतली आणि तो खटला लढवला. कालांतरानं त्या व्यक्तीला कळलं की, हे व्यर्थ आहे आणि मी तिची आभारी आहे की, तिनं माघार घेतली. त्यावेळी एकतामध्ये तुमचं करिअर घडवण्याची किंवा तोडण्याची ताकद होती आणि आजही ती ते करू शकते. हा खटला जवळजवळ एक वर्ष चालला आणि मी माझ्या नवीन शोचं चित्रीकरण चालू ठेवलं आणि प्रत्येक न्यायालयीन सुनावणीला उपस्थित राहिले."पुढे बरखा म्हणाली, "मी अभिमानानं सांगून आले होते की, मी जे काही करेन, ते मी स्वतः करेन. स्वतःच्या हिमतीवर करेन. म्हणून मला ते स्वतःला हाताळावं लागलं. त्यामुळे मी याबद्दल तेव्हा घरी काहीही सांगितलं नव्हतं. एक नवीन कलाकार म्हणून माझी कारकीर्द संपू शकली असती; पण काही दैवी शक्तीमुळे एकता मागे हटली.



# तुम्ही दहावी नापास आहात

दिवंगत अभिनेते ऋषी कपूर यांचे बॉलीवूडमधील योगदान महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी विविध भूमिका साकारत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. अनेक कलाकारांबरोबर काम केले होते. आजही त्यांच्याबद्दल अनेक जण बोलताना दिसतात. त्यांच्या खुल्लम खुल्ला या आत्मचरित्रात त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग, घटना लिहिल्या आहेत. त्याबाबतही अनेकदा चर्चा होताना दिसते. आता अभिनेत्री पूनम ढिल्लों यांनी एका मुलाखतीत ऋषी कपूर यांच्याबाबत एक वक्तव्य केले आहे. पूनम ढिल्लों यांनी नुकतीच हिंदी रशला मुलाखत दिली. या मुलाखतीत ऋषी कपूर यांची आठवण सांगताना त्या म्हणाल्या, "मी अनेकदा त्यांची तक्रार पत्नीला नीतूला करत असे. कारण- ऋषी कपूर आम्हाला अनेकदा ओरडत असत. त्यांच्यासमोर आम्ही लहान होतो." पुढे पूनम ढिल्लों यांनी असाही खुलासा केला की, ऋषी कपूर त्यांना इंग्रजीमध्ये बोलायला येते, हे सेटवर दाखवत असत. त्याबरोबरच त्यांच्या अवतीभोवती सेटवर असणाऱ्या अनेकांना इंग्रजी बोलायला किंवा वाचायला येत नाही, असा त्यांचा समज असे. त्याबाबत अधिक बोलताना पूनम ढिल्लों म्हणाल्या, "ऋषी कपूर यांना इंग्रजी येते याचा त्यांना अभिमान होता. ते टाइम मॅगझिन वाचायचे.

# तेजश्री 'होणार सून ह्या घरची

झी मराठी' वाहिनीवरील 'होणार सून मी ह्या घरची' ही गाजलेल्या मालिकांपैकी एक अशी मालिका. या मालिकेनं अडीच वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. शशांक केतकर, तेजश्री प्रधान, रोहिणी हट्टंगडी, सुहिता थत्ते, सुप्रिया पाठारे, लीना भागवत, पौर्णिमा तळवलकर, स्मिता सरोदे, मनोज जोशी, प्रसाद ओके, अतुल परचुरे, समीर चौघुले अशी तगडी कलाकार मंडळी 'होणार सून मी ह्या घरची' मालिकेत पाहायला मिळाली. ही मालिका अनेक जण आजही तितक्याच आवडीनं पाहतात. या मालिकेत झळकलेल्या मायलेकी जान्हवी व शशिकला यांचं नातं अजूनही तसंच घट्ट आहे. तेजश्री प्रधाननं नुकतीच शशिकला म्हणजेच अभिनेत्री आशा शेलार यांच्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे.



# मोनालिसाला चित्रपट ऑफर करणाऱ्याला अटक

बॉलीवूडचे कलाकार हे सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकांमुळे, कधी त्यांनी शेअर केलेल्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांनी मुलाखतीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता अभिनेत्री झरीन खानने कतरिना कैफबरोबर तुलना झाल्याने तिचे करिअर उद्ध्वस्त झाल्याचे वक्तव्य केले आहे. प्रसिद्ध कॉमेडियन भारती आणि हर्ष लिंबाचिया यांच्या पॉडकास्टमध्ये झरीन खानने हजेरी लावली होती. यामध्ये तिने आपल्या करिअरबद्दल वक्तव्य केले आहे. 'वीर' चित्रपटानंतर तिचा करिअरचा अनुभव कसा होता हे सांगताना ती म्हणते, ""वीर' चित्रपटानंतर माझे आयुष्य पूर्णपणे बदलले आहे. तो चित्रपट खूप मोठा होता आणि आतासुद्धा माझ्यासाठी माझे आयुष्य बदलणारा चित्रपट आहे. त्या चित्रपटानंतर मला वाईट अनुभव आले आहेत. माझी तुलना कतरिना कैफबरोबर केली जात होती. सुरुवातीला मला छान वाटले, कारण कतरिना खूप सुंदर आहे. पण, मला वाटते की ही गोष्ट इंडस्ट्रीमध्ये चुकीच्या पद्धतीने पसरली. माझ्यासाठी कतरिनाबरोबर तुलना होणे ही गोष्ट खूप मोठी होती, पण ती वाईट ठरली. या इंडस्ट्रीमधल्या अनेक लोकांना मी ओळखत नाही. अनेक दिग्दर्शक आणि निर्माते यांना फक्त मी त्यांच्या नावाने ओळखते. पण, सलमान खानने मला चित्रपटात आणले आहे म्हणून मी गर्विष्ठ आहे, असा अनेकांचा समज झाला."झरीन खान पुढे बोलताना म्हणते की, माझ्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात टीका होत होती की एक वेळ अशी आली, मला घराबाहेर पडणे अशक्य होऊ लागले.

# मुंबईचा वानखेडेवर दिमाखदार विजय!

## 43 चेंडू राखून केकेआरचा केला मोठा पराभव

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सूर्यकुमार यादवचा षटकार, अश्वनी कुमारचे ४ विकेट्स, रायन रिकल्टनचे अर्धशतक अन् मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५ मधील पहिला दणदणीत विजय मिळवला. मुंबईने घरच्या मैदानावर केकेआरला पराभवाचा मोठा धक्का दिला आहे. मुंबई इंडियन्सचा पदार्पणवीर अश्वनी कुमारचे ४ विकेट्स, सर्व गोलंदाजांची योग्य साथ आणि रायन रिकल्टनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ८ विकेट्सने विजय मिळवला आहे. मुंबईने केकेआरला १६.२ षटकांत ११६ धावांवर सर्वबाद केलं. तर नंतर ८ विकेट्सने आणि ४३ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला.**




मुंबई इंडियन्सला आयपीएल २०२५ च्या पहिल्या दोन्ही सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले होते. पण मुंबई इंडियन्सने केकेआरविरूद्ध तिसऱ्या सामन्यात पूर्ण ताकदीनिशी दणक्यात पुनरागमन केलं आहे. या विजयासह मुंबईचा संघ आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत अखेरच्या स्थानावरून थेट सहाव्या स्थानी पोहाचला आहे.केकेआरने वानखेडेच्या मैदानावर दिलेल्या ११७ धावांच्या छोट्या लक्ष्याच्या प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सने सावध सुरूवात केली. रोहित शर्मने एक षटकार खेचला खरा पण तो पुन्हा एकदा फेल ठरला. रोहित शर्मा १३ धावांवर बाद झाला. तर यानंतर रायन रिकल्टनने संघाच्या विजयाची जबाबदारी केली. रिकल्टनने ४१ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ६२ धावांची खेळी केली. तर विल जॅक्सही १ षटकार लगावत १६ धावा करत बाद झाला.वानखेडेच्या मैदानावर सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा फॉर्मात परतला आणि त्याच्या वादळी फटकेबाजीचा एक नमुना पाहायला मिळाला. सूर्यकुमार यादव गेल्या काही काळात फॉर्मात नव्हता, पण वानखेडेच्या मैदानावर उतरताच सूर्याने आपली वादळी खेळी केली. सूर्याने ३०० च्या स्ट्राईक रेटने ९ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह २७ धावांची खेळी केली आणि संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. केकेआरकडून आंद्रे रसेलला दोन विकेट घेण्यात यश मिळाले.मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय अगदी योग्य ठरला. बोल्ट आणि चहर या गोलंदाजी जोडीने केकेआरची झोप उडवली. संघाचे दोन्ही सलामीवीर १ धावा करत माघारी परतले. यानंतर अजिंक्य रहाणे ११ धावा तर अंगक्रिश रघुवंशी २६ धावाच करू शकला. रिंकू सिंग १७ धावा, मनिष पांडे १९ धावा तर रमणदीप सिंग २२ धावा करत बाद झाला. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांसमोर केकेआरच्या गोलंदाजांनी शरणागती पत्करली. पॉवरप्लेमध्येच केकेआरचा निम्मा संघ तंबूत परतला होता. मुंबईचा पदार्पणवीर अश्वनी कुमार या सामन्याचा हिरो ठरला. ज्याने ३ षटकांत २४ धावा देत ४ विकेट्स घेतले. दीपक चहरने २ तर बोल्ट, हार्दिक पंड्या, विघ्नेश पुथूर आणि सँटनर यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली. मुंबई इंडियन्सला आयपीएल २०२५ च्या पहिल्या दोन्ही सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले होते. पण मुंबई इंडियन्सने केकेआरविरूद्ध तिसऱ्या सामन्यात पूर्ण ताकदीनिशी दणक्यात पुनरागमन केलं आहे.

### सूर्याने वादळी खेळी केली

या विजयासह मुंबईचा संघ आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत अखेरच्या स्थानावरून थेट सहाव्या स्थानी पोहाचला आहे.केकेआरने वानखेडेच्या मैदानावर दिलेल्या ११७ धावांच्या छोट्या लक्ष्याच्या प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सने सावध सुरूवात केली. रोहित शर्मने एक षटकार खेचला खरा पण तो पुन्हा एकदा फेल ठरला. रोहित शर्मा १३ धावांवर बाद झाला. तर यानंतर रायन रिकल्टनने संघाच्या विजयाची जबाबदारी केली. रिकल्टनने ४१ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ६२ धावांची खेळी केली. तर विल जॅक्सही १ षटकार लगावत १६ धावा करत बाद झाला.वानखेडेच्या मैदानावर सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा फॉर्मात परतला आणि त्याच्या वादळी फटकेबाजीचा एक नमुना पाहायला मिळाला. सूर्यकुमार यादव गेल्या काही काळात फॉर्मात नव्हता, पण वानखेडेच्या मैदानावर उतरताच सूर्याने आपली वादळी खेळी केली.

# मॅचच्या टेन्शनमुळे दुपारी जेवलो नाही!

## मुंबई इंडियन्सकडून अश्वनी कुमारचा पदार्पणाच्या सामन्यात मोठा विक्रम

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातील अश्वनी कुमार हे नाव आता सर्वांच्या परिचयाचं झालं आहे. अश्वनी कुमारने आयपीएल २०२५ मधील केकेआरविरूद्धच्या सामन्यात पदार्पण केले आणि पदार्पणात त्याने ४ विकेट्स घेत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. मुंबई इंडियन्सच्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडेच्या मैदानावर हा सामना खेळवला जात आहे.**




या ऐतिहासिक कामगिरीनंतर अश्वनी कुमार मुलाखतीत म्हणाला की तो दुपारी जेवलेला नाही.अश्वनी कुमारचा हा पहिलाच आयपीएल सामना होता. मुंबई इंडियन्सने आयपीएल लिलावात त्याला ३० लाख रूपयांच्या किमतीसह संघात सामील केलं होतं. २०२३ च्या शेर-ए-पंजाब ट्रॉफीमध्ये तो सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता, या कामगिरीसह त्याने संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली होती.२३ वर्षीय डावखुरा वेगवान गोलंदाज अश्वनी कुमार पंजाबकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो आणि तो मोहालीच्या झांजेरी गावचा आहे. गेल्या मोसमात त्याचा पंजाब किंग्ज संघात समावेश करण्यात आला होता, मात्र त्याला पदार्पणाची संधी मिळाली नाही.पदार्पणाच्या सामन्यात चार विकेट घेतल्यानंतर अश्विनी कुमार म्हणाला, “या कामगिरीनंतर खूप छान वाटतंय, पदार्पणाच्या सामन्यात दडपण होतं पण सांघिक वातावरणामुळे शांत राहण्यास मदत झाली. मी आज दुपारी जेवलो नाही आणि फक्त केळं खाल्लं. सामन्याचं इतकं टेन्शन होतं की मला भूकही लागत नव्हती. संघ व्यवस्थापनाने सांगितले की हा पदार्पण सामना आहे, मैदानावर जाऊन गोलंदाजीचा आनंद घे आणि आपल्या कौशल्यावर फोकस करत गोलंदाजी कर.”पुढे अश्वनी म्हणाला, “कर्णधाराने (हार्दिक पांड्या) चांगली साथ दिली आणि चेंडू विकेटवर टाकत राहण्याचा सल्ला दिला. माझ्या गावातील सगळे मला सामन्यात खेळताना पाहत असतील. मला आज खेळण्याची संधी मिळाली आणि मी खूप आनंदी आहे.”मुंबई संघात दाखल झालेल्या अश्वनी कुमारने आयपीएल कारकिर्दीतील पहिल्याच चेंडूवर अजिंक्य रहाणेला झेलबाद केले. यानंतर त्याने मागे वळून पाहिलं नाही आणि विकेट्सची रांग लावली. अश्वनी कुमारने तीन षटकांत २४ धावा देत चार विकेट घेतले.

### अश्वनीचा पहिलाच सामना

या ऐतिहासिक कामगिरीनंतर अश्वनी कुमार मुलाखतीत म्हणाला की तो दुपारी जेवलेला नाही.अश्वनी कुमारचा हा पहिलाच आयपीएल सामना होता. मुंबई इंडियन्सने आयपीएल लिलावात त्याला ३० लाख रूपयांच्या किमतीसह संघात सामील केलं होतं. २०२३ च्या शेर-ए-पंजाब ट्रॉफीमध्ये तो सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 1 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch



**ADMISSIONS OPEN**

**2025-26**

'C' भाषा
₹ १३००/-

'C++' भाषा
₹ १३००/-

बेसिक जावा
₹ १३००/-

स्क्रॅच ॲनिमेशन
₹ १३००/-

बेसिक टॅली
₹ १५००/-

एम.एस. ऑफिस
₹ १५००/-

कोरल ड्रॉ
₹ ११००/-

Adobe AB फोटोशॉप
₹ ११००/-

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046